**DeccanIAS™** UPSC/MPSC

संच क्र. **D**

G11

**2020**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.
वेळ : 1 (एक) तास

# प्रश्नपुस्तिका
# सामान्य क्षमता चाचणी – 1

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे**. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.''**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अश्या व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Email : executivedeccanias@gmail.com **Mob : 9421535607 /7517685197**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

DeccanIAS

1. पुढे दिलेल्या विधानांपैकी असत्य विधाने ओळखा.

अ) अनुच्छेद 22 मध्ये समावेश असलेले 'प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेसंबंधीचे' (preventive detention) संरक्षण भारतीय तसेच परकीय नागरिकांनादेखील उपलब्ध आहे.

ब) 'मनेका गांधी खटल्यात (1978)' सर्वोच्च न्यायालयाने जीविताच्या आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अधिकाराला व्यापक अर्थ देत केवळ भारतीय व्यक्तींच्या जीविताचे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यापासून संरक्षण केले.

क) अनुच्छेद 20 मधील 'नो सेल्फ इन्क्रिमिनेशन' (No Self incrimination) हे तत्त्व केवळ फौजदारी प्रक्रियेकरिता लागू आहे, दिवाणी प्रक्रियेला नाही.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) ब, क 4) अ, ब, क

---

2. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकारक्षेत्रात पुढीलपैकी कशाचा समावेश होत नाही ?

1) अनु.32 अंतर्गत मूलभूत हक्कांच्या भंगाकरिता व्यक्तीने मागितलेली दाद

2) केंद्र आणि राज्य यांच्यातील संघराज्यात्मक विवाद.

3) वित्त आयोगाच्या शिफारशींसंबंधीचे विवाद.

4) यापैकी नाही.

---

3. घटक राज्यांच्या विधानपरिषदेतील सदस्यांची संरचनात्मक योजना/पद्धत (Scheme of Composition) कोण ठरवू/बदलू शकते ?

1) राज्य विधिमंडळ

2) राज्य शासन

3) संसद

4) यापैकी नाही; कारण ती पद्धत संविधानाने ठरवून दिल्याने त्यात बदल करता येत नाही.

---

4. चुकीची जोडी ओळखा.

| अनुच्छेद | | तरतुद |
|---|---|---|
| 1) 177 | – | मंत्र्यांना आणि राज्याच्या महाधिवक्त्यांना राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये उपस्थित राहण्याचा, बोलण्याचा, मतदानाचा अधिकार |
| 2) 167 | – | मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये |
| 3) 166 | – | राज्यपालांचा राज्यशासनाच्या व्यवहारासंदर्भात नियम करण्याचा अधिकार |
| 4) 155 | – | राज्यपालांची नेमणूक |



DeccanIAS

5. पुढीलपैकी कोणत्या संघशासित प्रदेशांमध्ये (UT's) सन 2019च्या लोकसभा निवडणुकांमध्ये अनुसूचित जमातींकरिता (ST's) एकही जागा आरक्षित नव्हती?

1) दादरा आणि नगरहवेली
2) लक्ष्यद्वीप
3) अंदमान आणि निकोबार
4) 1 आणि 2 दोन्ही पर्याय योग्य

---

6. लावलेली 'राष्ट्रीय आणीबाणी' चालू रहावी (Continuance) यांकरिता मंजुरी देणारा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहात कोणत्या प्रकारच्या बहुमताने पारित करणे गरजेचे असते?

1) विशेष बहुमत (Special Majority)
2) साधे बहुमत (Simple Majority)
3) प्रभावी बहुमत (Effective Majority)
4) सर्वंकष बहुमत (Absolate Majority)

---

7. 'मानवी हक्क संरक्षण (दुरूस्ती) अधिनियम, 2019' नुसार 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' आणि 'राज्य मानवी हक्क आयोग' यांच्या अध्यक्षांच्या मुदतीत खालीलपैकी कोणता बदल केला गेला आहे?

1) ती दोन वर्षांनी वाढवण्यात आली.
2) ती दोन वर्षांनी घटवण्यात आली.
3) ती तीन वर्षांनी घटवण्यात आली.
4) ती तीन वर्षांनी वाढवण्यात आली.

---

8. भारताच्या 'महान्यायवादी' (AGI) पदासंबंधीची चुकीची विधाने निवडा.

अ) अनु.76 आणि अनु.77 मध्ये या पदांसंबंधीच्या काही तरतुदी असून ते भारताचे सर्वोच्च कायदा अधिकारी असतात.

ब) अनु.76 मध्ये तरतुद केल्याप्रमाणे भारत शासनाच्या वतीने ते सर्वोच्च न्यायालयात वकील म्हणून अशा सर्व खटल्यांमध्ये बाजू लढवतात जिथे भारत शासन संबंधित असते.

क) त्यांचे वेतन संविधानात दिलेले नाही; मात्र त्यांचा कार्यकाळ मात्र संविधानात दिलेला आहे.

1) फक्त क
2) अ, क
3) अ, ब
4) अ, ब, क

---

9. भारत आणि त्यांचे शेजारील राष्ट्र यांच्यामधील सीमाविवादांचे निवारण (Settlement of boundary dispute) करण्याचा अधिकार कोणाला आहे?

1) संसद
2) केंद्र शासन
3) सर्वोच्च न्यायालय
4) राष्ट्रपती

---

10. भारतीयांना दिले जाणारे हक्क न्यायालयीन निर्णययोग्य (Justiciable) आणि 'न्यायालयीन निर्णययोग्य नसणारे' (Non-Justiable) या दोन भागांमध्ये विभागलेले असावेत अशी शिफारस कोणी केली होती?

1) जवाहरलाल नेहरू
2) डॉ.बी.आर.आंबेडकर
3) सर बी.एन्.राऊ
4) के.एम्.मुन्शी

---



DeccanIAS

11. 'जिल्हा विकास आयुक्त' हे नवीन पद निर्माण करून त्या पदावरील व्यक्तीने जिल्हा परिषदेच्या 'मुख्य कार्यकारी अधिकारी' पदाचा पदभार सांभाळावा अशी शिफारस कोणत्या समितीने केली आहे?

1) जी.व्ही.के.राव समिती (1985)
2) अशोक मेहता समिती (1977)
3) व्ही.आर.राव.समिती (1960)
4) एल.एम्.सिंघवी समिती (1986)

---

12. योग्य जोडी/जोड्या ओळखा.

| **विषय** | | **सूची (List)** |
|---|---|---|
| अ) कृषी, कृषी शिक्षण आणि संशोधन यांसहित | – | राज्य सूची |
| ब) कर्ज-पुरवठा आणि कर्ज-पुरवठादार, कृषी कर्ज माफी | – | राज्य सूची |
| क) कृषी उत्पन्नावरील कर | – | राज्य सूची |
| ड) भाव नियंत्रण | – | राज्य सूची |
| इ) वीज | – | समवर्ती सूची |
| फ) विमा | – | संघ सूची |

1) अ, ब, क, इ, फ
2) अ, ब, क, ड, इ
3) ब, क, ड, इ, फ
4) क, ड, इ

DeccanIAS

---

13. पुढे दिलेल्या विधानांपैकी असत्य विधाने निवडा.

अ) सरपंच/उपसरपंचाला त्यांच्याविरुद्ध संमत अविश्वास ठरावाच्या विधिग्राह्यतेविषयी आक्षेप असल्यास, त्याला 7 दिवसांच्या आत तहसिलदारांकडे दाद मागता येते.

ब) सरपंच/उपसरपंच या दोघांविरुद्धही अविश्वास ठराव मंजूर झाल्यास त्यावरील विवादाचा निर्णय होईपर्यंत सरपंचाचे अधिकार, कर्तव्ये इ. तहसिलदारांकडे निहित होतात.

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ आणि ब
4) दोन्ही नाही

---

14. दुसऱ्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी यांच्यासह पुढीलपैकी कोणती स्त्री प्रतिनिधी उपस्थित होती?

1) सरोजिनी नायडू
2) सुचेता कृपलानी
3) राजकुमारी अमृत कौर
4) हंसा मेहता

---

15. अयोग्य जोडी ओळखा.

1) ज्ञानसिंधू – विरेश्वर छत्रे
2) ज्ञानोदय – देवदत्त
3) ज्ञानप्रकाश – काकासाहेब लिमये
4) अरुणोदय – ग.ल.चंदावरकर

16. पुढीलपैकी कोणती/कोणत्या व्यक्ती 'भारतीय राष्ट्रीय सभेच्या' अध्यक्षस्थानी नव्हत्या?

अ) हेन्री कॉटन

ब) जॉर्ज युल

क) सय्यद बद्रुद्दीन तय्यबजी

ड) आल्फ्रेड वेब

इ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

1) फक्त इ    2) क, इ    3) अ, ब, ड    4) यापैकी नाही

---

17. पुढील घटना कालानुक्रमे जुळवा.

अ) लॉर्ड आयर्विनने गोलमेज परिषदेचा पर्याय सुचवला.

ब) भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी केंद्रीय कायदेमंडळात बॉम्ब फेकला.

क) बटलर समितीची नेमणूक.

ड) सायमन आयोगाने दोन खंडातला अहवाल प्रकाशित केला.

1) ब-ड-क-अ    2) क-ब-अ-ड    3) ब-क-ड-अ    4) क-ब-ड-अ

---

18. 'मूकनायक' हे वृत्तपत्र डॉ.आंबेडकरांनी सुरू केले होते. या कार्याकरिता त्यांना कोणी अर्थसहाय्य केले होते?

1) सयाजीराव गायकवाड    2) न्या.चंदावरकर

3) राजर्षी शाहू महाराज    4) दिनकरराव जवळकर

---

19. 'द राईज ऑफ द मराठा पॉवर' या ग्रंथात पुढीलपैकी कोणी मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी विस्ताराने मांडली?

1) वि.दा.सावरकर    2) वि.का.राजवाडे    3) विल्यम जोन्स    4) न्या. रानडे

---

20. ''या युद्धात आम्ही टिपूला हतबल केले; पण त्याचबरोबर आम्हांला मदत करणाऱ्या मराठे किंवा निजाम या आमच्या मित्रांना प्रबळ होऊ दिले नाही'' - हे वाक्य कोणी अणि कोणत्या प्रसंगासंदर्भात म्हटले आहे?

1) लॉर्ड कॉर्नवालिस, तिसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध

2) वॉरेन हेस्टिंग्ज, दुसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध

3) लॉर्ड कॉर्नवालिस, चौथे इंग्रज-म्हैसूर युद्ध

4) लॉर्ड वेलस्ली, चौथेइंग्रज-म्हैसूर युद्ध



DeccanIAS

21. सन 1857 च्या उठावात महाराष्ट्रातील भोसले कुळातील पुढीलपैकी कोणाचा वापर नागपूर येथील उठाव निष्प्रभ करण्यासाठी केला गेला होता?

1) फिदा अली  2) बाकाबाई  3) अप्पासाहेब  4) चिमासाहेब

---

22. ॲनी बेझंट यांनी औपचारिकरित्या होमरूल चळवळीची घोषणा केल्यानंतर पुढीलपैकी कोणती नियतकालिके सुरू केली?

अ) न्यू इंडिया  ब) कॉमनविल  क) इन्किलाब

1) फक्त क  2) अ, ब  3) अ, ब, क  4) यापैकी नाही

---

23. – यांचा पिंड महात्मा गांधींप्रमाणे होता.
– सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाल्याबद्दल त्यांना अटक झाली होती.
– त्यांच्या नेतृत्त्वाखालील चळवळीमुळे केशवराव जेधे यांच्यासारखा बहुजन समाजातील नेता काँग्रेसकडे वळला.
– त्यांचा प्रार्थना समाजाशी संबंध होता.

वरील विवरणावरून व्यक्ती ओळखा.

1) वि.रा.शिंदे  2) विनोबा भावे  3) बापूजी अणे  4) सेनापती बापट

---

24. उर्दूतील पहिले दैनिक असणाऱ्या 'उर्दू गाइडची' सुरुवात कोठून झाली होती?

1) बॉम्बे  2) लखनौ  3) कलकत्ता  4) लाहोर

---

25. 'अनार्यदोष परिहार' या संस्थेची स्थापना पुढीलपैकी कोणी केली होती?

1) सीताराम केशव बोले  2) महात्मा फुले
3) विष्णुबुवा ब्रम्हचारी  4) गोपाळबुवा वलंगकर

---

26. खालीलपैकी कोणत्या घटनेला स्थानिक प्रश्नांबरोबरच थेट आंतरराष्ट्रीय संदर्भदेखील होता?

1) एका चळवळ  2) दखखनचे दंगे
3) पाबना कृषी चळवळ  4) बार्डोली सत्याग्रह

---

27. पुढीलपैकी कोणत्या प्रसंगामुळे कंपनीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रुपाने भारताचे साम्राज्य मिळाले, असे मत सिडनी ओवनने व्यक्त केले आहे?

1) सालबाईचा तह  2) वसईचा तह  3) बक्सारचे युद्ध  4) प्लासीची लढाई



DeccanIAS

28. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्याविषयीचे अयोग्य विधान निवडा.

अ) सन 1852 मध्ये त्यांची डेप्युटी कलेक्टर म्हणून नियुक्ती झाली होती.

ब) भिल्लांच्या बंडांचा त्यांनी कुशलतेने बीमोड केला.

क) त्यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर 'मानवधर्म सभा' स्थापन केली.

1) फक्त अ 2) अ, ब 3) फक्त क 4) यांपैकी नाही

---

29. पुढीलपैकी कोणता तालुका महाराष्ट्रातील सर्वांत उत्तरेकडचा तालुका आहे?

1) नवापूर - नंदुरबार जिल्हा

2) आमगाव - गोंदिया जिल्हा

3) मुक्ताईनगर - जळगाव

4) धडगाव अक्राणी - नंदुरबार

---

30. पुढीलपैकी कोणते नदीखोरे हे गोदावरी नदी खोऱ्याचा भाग नसेल?

1) वर्धा नदी खोरे 2) पैनगंगा नदी खोरे

3) वाघूर नदी खोरे 4) पेनगंगा नदी खोरे

---

31. महाराष्ट्राची दक्षिणोत्तर लांबी सुमारे ........ किमी आहे.

1) 800 2) 720 3) 612 4) 832

---

32. पशु जमाती व संबंधित राज्य यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| **पशु जमाती** | **राज्य** |
|---|---|
| अ) डांगी | 1) गुजरात |
| ब) गीर | 2) महाराष्ट्र, मध्यप्रदेश |
| क) हिस्सार | 3) नागालँड |
| ड) थो थो | 4) पंजाब |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 2 | 3 | 4 | 1 |
| 3) | 2 | 1 | 4 | 3 |
| 4) | 2 | 1 | 3 | 4 |



DeccanIAS

33. पुढे काही देश व स्थलांतरीत शेतीस त्या-त्या संबंधित देशात काय म्हणतात यांच्या जोड्या दिल्या आहेत. यापैकी अयोग्य जोडी ओळखा.

| **देश/प्रदेश** | | **स्थलांतरीत शेती** |
|---|---|---|
| 1) इंडोनेशिया | – | लडांग |
| 2) मध्य अमेरिका | – | मिल्पा |
| 3) चेना | – | श्रीलंका |
| 4) रे | – | थायलंड |

---

34. देशातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प- कोयना प्रकल्प कोठे आहे?

1) देशमुखवाडी, सातारा जिल्हा
2) फलटण, सातारा जिल्हा
3) वडूज, सातारा जिल्हा
4) वाई, सातारा जिल्हा

---

35. पुढे दिलेल्या महाराष्ट्रातील पर्वत शिखरांचा उत्तर-दक्षिण असा योग्य क्रम ओळखा.

1) तोरणा, राजगड, सिंगी, हनुमान
2) अस्तंभा, हनुमान, तौला, महाबळेश्वर
3) चिखलदरा, कळसुबाई, हनुमान, राजगड
4) सप्तश्रृंगी, कळसुबाई, राजगड, साल्हेर

---

36. जोड्या जुळवा.

| **जिल्हा** | **खनिज** |
|---|---|
| अ) रायगड | 1) बॉक्साईट |
| ब) यवतमाळ | 2) चुनखडी |
| क) मँगनिज | 3) नागपूर |

| | **अ** | **ब** | **क** |
|---|---|---|---|
| 1) | 2 | 3 | 1 |
| 2) | 1 | 2 | 3 |
| 3) | 3 | 2 | 1 |

---

37. त्रिवार्थ यांच्या मतानुसार महाराष्ट्रातील हवामानाचे काही विभाग पाडता येतील. त्रिवार्थ यांनी महाराष्ट्रातील शुष्क, निमओसाड, उष्णकटीबंधीय प्रदेशाचे वर्गीकरण कसे केले आहे?

1) AW
2) AM
3) Bsh
4) E




DeccanIAS

38. योग्य जोड्या जुळवा.

| **जलविद्युत प्रकल्प** | **जिल्हा** |
|---|---|
| अ) येलदरी | 1) जळगांव |
| ब) कोराडी | 2) परभणी |
| क) फेकरी | 3) चंद्रपूर |
| ड) दूर्गापूर | 4) नागपूर |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 4 | 3 | 1 |
| 2) | 2 | 4 | 1 | 3 |
| 3) | 1 | 4 | 3 | 2 |
| 4) | 3 | 2 | 1 | 4 |

39. पुढे दिलेला नकाशा महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्याचा नकाशा आहे हे ओळखा.




1) अहमदनगर 2) पुणे
3) सोलापूर 4) सांगली

40. जोड्या जुळवा.

| **पुळण** | **जिल्हा** |
|---|---|
| अ) डहाणू | 1) सिंधुदुर्ग |
| ब) देवगड | 2) रायगड |
| क) श्रीवर्धन | 3) पालघर |
| ड) गणपतीपुळे | 4) रत्नागिरी |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 2 | 1 | 4 |
| 2) | 3 | 1 | 2 | 4 |
| 3) | 2 | 1 | 4 | 3 |
| 4) | 4 | 3 | 2 | 1 |

41. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील पुढीलपैकी कोणता जिल्हा सर्वात कमी पुरुष लोकसंख्येचा जिल्हा आहे ?

1) हिंगोली 2) गडचिरोली 3) सिंधुदुर्ग 4) रायगड

---

42. महाराष्ट्राचा रेखावृत्तीय विस्तार ओळखा.

1) $15^0$ 48' ते $22^0$ 6' उत्तर रेखावृत्त
2) $72^0$ 36' ते $83^0$ 54' पूर्व रेखावृत्त
3) $72^0$ 36' ते $80^0$ 45' पूर्व रेखावृत्त
4) $10^0$ 32' ते $80^0$ 45' पूर्व रेखावृत्त

---

43. महाराष्ट्रातील पुढीलपैकी कोणती नदी खोल घळईतून वाहत जाते आणि या नदीच्या खोल घळईमुळे अमरावती जिल्ह्याची वायव्य सरहद तयार झाली आहे ?

1) गिरणा 2) गोदावरी 3) वैनगंगा 4) तापी

---

44. पुढे दिलेल्या विधानांपैकी अयोग्य विधाने ओळखा.

अ) भारतीय अर्थव्यवस्थेतील 'स्थूल देशांतर्गत बचती' (Gross Domestic Savings) चे GDP शी असणारे प्रमाण हे 1990–1991 पासून सलगपणे वाढत गेले आहे.

ब) एकूण बचतीमध्ये 'कुटुंबे' (Private Households) आणि 'खाजगी कॉर्पोरेट' (Private Corporate) या दोन क्षेत्रांचाच विचार होतो.

क) एकूण बचतीत विविध क्षेत्रांचे योगदान विचारात घेतले असता 'कुटुंबे' या क्षेत्रांचे योगदान 1950 –51 पासून नेहमी जास्त राहिले आहे.

1) फक्त अ, ब
2) फक्त ब, क
3) फक्त अ, क
4) एकही विधान अयोग्य नाही.

---

45. भारतीय नियोजन प्रक्रियेमध्ये राबवल्या गेलेल्या सर्व बारा पंचवार्षिक योजनांच्या संदर्भात वाढीचे ध्येय हे सांख्यिकीयदृष्ट्या ……च्या संदर्भात ठेवले गेले होते.

1) राष्ट्रीय उत्पन्न (National Income)
2) निव्वळ देशांतर्गत उत्पादन (Net Domestic Product)
3) घटक किंमतीवरील स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product at factor cost)
4) यापैकी नाही.

46. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (Multi-dimensional Poverty Index) हा ..... यांच्या गुणाकारातून मिळतो.

अ) बहुआयामी दारिद्र्य शिरगणती गुणोत्तर (Multidimensional poverty headcount index)

ब) बहुआयामी दारिद्र्याची सरासरी तीव्रता (average intensity of multidimensional poverty)

क) 'आरोग्य, शिक्षण आणि जीवनमान' या तीन उपघटकांचे निर्देशांक

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

---

47. अभिजीत बॅनर्जी आणि ईस्थर डफलो यांच्या दारिद्र्यविषयक अभ्यासामध्ये त्यांनी ...... या पद्धतीचा वापर केला.

1) 'कंट्रोल्ड रॅन्डम ट्रायल्स' 2) 'ट्रायल रॅन्डम कंट्रोल'

3) 'रॅन्डमाईज्ड कंट्रोल्ड ट्रायल्स' 4) 'कंट्रोल्ड रॅन्डमाईज्ड ट्रायल्स'

---

48. दारिद्र्यमोजणीकरिता निती आयोगाने श्री अरविंद पानगढिया यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कार्यगटाने असे सुचवले की,

अ) दारिद्र्यरेषा ही कॅलरीमूल्याच्या आधारे ठरवावी.

ब) दारिद्र्यरेषेऐवजी सामाजिक-आर्थिक जात जनगणने (Socio-Economic Caste census) ची आकडेवारी वापरावी.

क) लाभांचे वैश्विकरण (Universalization of benefits) करून लाभार्थी ओळखण्या (Beneficiary identification) संदर्भातील अडचणी दूर कराव्यात.

वरीलपैकी कोणती विधाने अयोग्य आहेत ते ओळखून योग्य तो पर्याय निवडा.

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

---

49. RBI च्या संदर्भात बिमल जालान समितीने ऑगस्ट 2019 मध्ये एक महत्वपूर्ण शिफारस केली. ही शिफारस खालीलपैकी कोणत्या संदर्भात होती?

1) मौद्रिक धोरण समिती (Monetary Policy Committee) ची पुनर्रचना करणे.

2) RBI चे वित्तीय वर्ष (Financial Year) बदलणे.

3) RBI कडील 'अतिरिक्ताचे हस्तांतरण' (Surplus Transfer) अधिक नियमाधिष्ठित बनवणे.

4) नवीन बँकांना परवाने देण्यासंदर्भात नियम बनवणे.



DeccanIAS

50. पुढे दिलेल्या विधानांपैकी अयोग्य विधाने ओळखा.

अ) 'केंद्र क्षेत्रीय योजना' (Central Sector Schemes) या केंद्रसरकारकडून राबवल्या जातात तसेच या योजनांसाठी वित्तपुरवठा हा संपूर्णतः केंद्राकडून केला जातो.

ब) केंद्रपुरस्कृत योजनां (Centrally Sponsered Scheme) मध्ये वित्तपुरवठा हा केंद्र आणि राज्यांकडून केला जातो.

क) केंद्रपुरस्कृत योजनांची अंमलबजावणी ही राज्यांकडून केली जाते.

ड) केंद्रपुरस्कृत योजना या राज्यघटनेतील सातव्या परिशिष्टातील राज्यसूची (State List) मधील विषयांवरील असतात.

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त ब, ड 4) एकही नाही.

---

51. पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) कृषीक्षेत्रास संस्थात्मक कर्ज पुरवठा (institutional credit) करण्यात सहकारी बँका(co-operative banks), व्यापारी बँका (commercial banks) आणि प्रादेशिक ग्रामीण बँका (RRB's) यांच्यामध्ये सध्या व्यापारी बँकांचा वाटा हा सर्वाधिक आहे.

ब) 1991-92 पूर्वी यामध्ये सहकारी बँकांचा वाटा सर्वाधिक होता मात्र 1991-92 पासून व्यापारी बँकांनी त्यांना मागे टाकले.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही

---

52. भांडवली खात्यावर रूपया पूर्णपणे परिवर्तनीय करण्याचे खालीलपैकी कोणते लाभ होऊ शकतात असे सांगितले जाते?

अ) गुंतवणुकीत वाढ

ब) राजकोषीय तूटीत (Fiscal Deficit) भर

क) अर्थव्यवस्थेचा व्यवहारतोल (Balance of Payments) अधिक संतुलित राहणे.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) सर्व

---

53. पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) 1962 पर्यंत RBI ने ''महाग पैसा धोरण'' (Dear Money Policy) राबवले.

ब) नियोजनप्रक्रियेत 1951 ते 1962 या काळात खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी या धोरणाचा उपयोग होईल असे धोरणकर्त्यांना वाटले.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) यापैकी नाही



DeccanIAS

54. पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) VAT हा 'उगम-आधारित'(Origin Based) कर होता, तर GST हा 'गंतव्य-आधारित (Destination Based) कर आहे.

ब) मूलतः चलनवाढ रोखण्यासाठी वापरले जाणारे राजकोषीय साधन (Fiscal instrument) असते.

क) अप्रत्यक्ष कर (Indirect Taxes) हे भाववाढकारक (inflatinary) ठरू शकतात.

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

---

55. खालील विधाने वाचून पर्यायांमधून योग्य उत्तर निवडा.

अ) पहिल्या पंचवार्षिक योजनेदरम्यान वस्तू व सेवाच्या किंमतींचा निर्देशांक कमी झाला होता.

ब) किंमतींचा निर्देशांक कमी झालेली पहिली पंचवार्षिक योजना ही एकमेव योजना होती.

क) बाजारातील पैसा पुरवठा कमी ठेवल्यामुळे या काळात किंमती कमी राहिल्या होत्या.

ड) मुळात वस्तू आणि सेवांच्या मागणीपेक्षा त्यांचा पुरवठा कमी राहिला; म्हणून या काळात किंमती कमी राहिल्या होत्या.

1) अ आणि ब बरोबर आणि क हे त्यामागचे योग्य कारण आहे.

2) अ आणि ब बरोबर आणि ड हे त्यामागचे योग्य कारण आहे.

3) अ आणि ब बरोबर मात्र क किंवा ड पैकी कोणतेच त्यामागचे कारण स्पष्ट करत नाही.

4) अ बरोबर मात्र ब चूक

---

56. 1997 सालच्या नरसिंहम II समितीने ''नॅरो बँकिंग'' चे तत्त्व प्रायोगिकरित्या अनुसरण्याचा सल्ला दिला होता. नॅरो बँकिंगमध्ये,

अ) दुर्बल बँकांनी त्यांचा निधी अल्पकालीन जोखीमरहित (Short term risk free) मालमत्तांमध्ये गुंतवावा.

ब) दुर्बल बँकांनी आपल्या ठेवींना सुरक्षित तरल मालमत्तांची (liquid assets) जोड द्यावी.

1) फक्त अ चा समावेश होतो. 2) फक्त ब चा समावेश होतो

3) अ आणि ब दोन्हींचा समावेश होतो 4) अ आणि ब दोन्हींचा समावेश होत नाही

---

57. पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) 'प्राथमिक तूट' (Primary deficit) ही संकल्पना 1991-92 च्या अर्थसंकल्पापासून वापरण्यात येऊ लागली.

ब) 'प्रभावी महसूली तूट' (Effective revenue deficit) ही संकल्पना 2010-2011 च्या अर्थसंकल्पापासून वापरण्यात येऊ लागली.

1) फक्त अ 2)फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही



DeccanIAS

58. ''सीमांतिक स्थायी सुविधा'' (Marginal standing facility) हे RBI कडील पतनियंत्रणा (Monetary Control) चे –

अ) संख्यात्मक (quantitative)

ब) प्रत्यक्ष (direct)

क) गुणत्मक (quantitative)

ड) अप्रत्यक्ष (indirect)

साधन आहे.

1) अ, ब बरोबर
2) अ, ड बरोबर
3) ब, क बरोबर
4) ब, ड बरोबर

---

59. खालीलपैकी कोणत्या दोन ठिकाणांदरम्यान दुसरी 'वंदे भारत एक्सप्रेस' सुरू करण्यात आली?

1) दिल्ली–आग्रा
2) अहमदाबाद–दिल्ली
3) दिल्ली–कटारा
4) दिल्ली–ग्रेटर नोएडा

---

60. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

1) 'नोमॅडीक एलिफंट' (Nomadic Elephant) हा 'भारत' व 'कझाकिस्तान' दरम्यानचा संयुक्त लष्करी सराव आहे.
2) 'नोमॅडिक एलिफंट 2019' हा लष्करी सराव हिमाचल प्रदेशातील 'बाक्लोह' (Bakloh) येथे पार पडला.
3) 'नोमॅडिक एलिफंट 2019' हा लष्करी सराव 'नोमॅडिक एलिफंट' या सराव साखळीतील 14 वा सराव ठरला.
4) वरीलपैकी एकही नाही.

---

61. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर आपल्या पहिल्या विदेश दौऱ्यासाठी खालीलपैकी कोणत्या देशाची निवड केली?

1) भूटान
2) मालदीव
3) अमेरिका (USA)
4) इस्राईल (Israel)

---

62. 'स्वच्छ रेल्वे स्थानक सर्वेक्षण – 2019', नुसार खालीलपैकी कोणते रेल्वेस्थानक देशातील सर्वांत स्वच्छ रेल्वे स्थानक ठरले?

1) जोधपूर
2) बियास
3) जयपूर
4) विजयवाडा



DeccanIAS

63. 'गन आयलंड' (Gun Island) या कादंबरीचे लेखक कोण आहेत?

1) शशी थरूर 2) अरुंधती रॉय 3) सुनिता नारायण 4) अमिताव घोष

---

64. 2019 मध्ये 'दोहा' येथे पार पडलेल्या जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत '100 मीटर' धावण्याची शर्यत जिंकणारा 'क्रिस्टियन कोलमन' (Christian Coleman) कोणत्या देशाचा खेळाडू आहे?

1) अमेरिका 2) केनिया 3) जमैका 4) कॅनडा

---

65. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेले आंतरराष्ट्रीय पुरस्कार व संबंधित देश यांच्या पर्यायांपैकी चुकीचा पर्याय कोणता आहे ते सांगा?

1) किंग हमद ऑर्डर ऑफ द रेनेसान्स – ईराण
2) ऑर्डर ऑफ झाएद – संयुक्त अरब अमिराती (UAE)
3) स्टेट ऑर्डर ऑफ गाझी अमिर अमानुल्लाह खान – अफगाणिस्तान
4) ऑर्डर ऑफ अब्दुलाजिज अल सौद – सौदी अरेबिया

---

66. 'पंतप्रधान श्रम योगी मान-धन' (PM-SYM) योजनेबाबत खालील विधाने विचारात घ्या.

अ) ही केवळ भूमीहीन शेतमजूरांसाठी असलेली पेंशन योजना आहे.
ब) 15 फेब्रुवारी 2019 रोजी केंद्रशासनाने ही योजना लागू केली.
क) केवळ 18 ते 60 वयोगटातील भूमीहीन शेतमजूर या योजनेसाठी पात्र आहेत.

पर्यायी उत्तरे :

1) अ आणि ब दोन्ही बरोबर आहेत. 2) केवळ ब बरोबर आहे.
3) विधान अ आणि क बरोबर आहेत. 4) केवळ विधान क बरोबर आहे.

---

67. भारतातील पहिले 'राष्ट्रीय पोलीस विद्यापीठ' (National Police University) कोठे स्थापन केले जाणार आहे?

1) जयपूर 2) हैद्राबाद 3) ग्रेटर नोएडा 4) चेन्नई

---

68. 'सी व्हिजिल'(cVIGIL) हे मोबाईल ॲप कोणी सुरू केले आहे?

1) भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) 2) केंद्रीय गृह मंत्रालय
3) केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालय 4) भारतीय निवडणूक आयोग

---



DeccanIAS

69. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

1) 19 वर्षाखालील आशिया क्रिकेट चषक (ACC U19 Asia Cup 2019) स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने बांग्लादेशला हरवून विजेतेपद पटकाविले.

2) या स्पर्धेचे आयोजन बांग्लादेशने केले होते.

3) या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात 28 धावात 5 बळी मिळवणारा मुंबईचा अथर्व अंकोलेकर सामनाविराचा मानकरी ठरला.

4) वरीलपैकी एकही नाही.

---

70. भारत व चीन दरम्यानचे दुसरे 'अनौपचारिक शिखर संमेलन' (Informal Summit) खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पार पडले?

1) अहमदाबाद 2) मामल्लपुरम 3) जयपूर 4) विशाखापट्टणम

---

71. केंद्रसरकारने 2019 मध्ये सुरू केलेला 'लक्ष्य' (LaQshya) उपक्रम कशाशी संबंधित आहे?

1) कुपोषण कमी करणे.

2) क्षयरोग निर्मूलन.

3) माता मृत्यू टाळणे व नवजात अर्भक मृत्यूदर कमी करणे.

4) महिला उद्योजिकांना नवीन उद्योग स्थापनेसाठी कर्ज पुरवठा करणे.

---

72. भारतात सध्या 28 राज्ये व 9 केंद्रशासित प्रदेश आहेत. नव्यानेच निर्माण करण्यात आलेले 'जम्मू-काश्मिर' आणि 'लडाख' हे दोन केंद्रशासित प्रदेश केव्हा अस्तित्वात आले?

1) 15 ऑगस्ट, 2019 2) 2 ऑक्टोबर, 2019

3) 15 सप्टेंबर, 2019 4) 31 ऑक्टोबर, 2019

---

73. वनस्पती साम्राज्या(Plant Kingdom)मधील पुढीलपैकी कोणत्या वर्गातील वनस्पती या प्रामुख्याने पाण्यात आढळून येतात?

1) ब्रायोफायटा 2) थॅलोफायटा 3) फॅनारोगॅम 4) टेरीडोफायटा

---

74. पुढीलपैकी कोणत्या क्षारांची आपल्या शरीराला गरज नसते?

1) झिंक 2) कोबाल्ट 3) मॅग्नेशियम 4) वरीलपैकी एकही नाही



DeccanIAS

75. पुढीलपैकी कोणते उत्प्रेरक हे प्रथिनांना त्यांच्या साध्या रूपात म्हणजेच अमिनो आम्लात रूपांतरीत करण्यात मदत करतात?

1) अमायलेज 2) ट्रिप्सेन 3) लायपेज 4) माल्टेज

---

76. नेफ्रॉनच्या कोणत्या भागात मूत्रनिर्मितीचा पहिला टप्पा म्हणजे 'अल्ट्रा फिल्ट्रेशन' हे घडून येते?

1) युरेटर 2) लुप ऑफ हेन्ले 3) PCT व DCT 4) ग्लोमीरुलस

---

77. मानवी हृदयाच्या कोणत्या कप्प्यात फुप्फुसाकडून ऑक्सिजनयुक्त रक्त घेऊन येणाऱ्या शिरा प्रवेश करतात?

1) उजवे निलय (Right Ventrical) 2) डावे निलय (Left Ventrical)

3) उजवे अलिंद (Right Arteria) 4) डावे अलिंद (Left Arteria)

---

78. पुढीलपैकी कोणते हाड हे मानवी कवटी (Skull) चा भाग नाही?

1) परायटल 2) इनकस 3) टेम्पोरल 4) ऑसीपेटल

---

79. पुढीलपैकी कोणत्या सेंद्रीय संयुगामध्ये -OH हा कार्यकारी समूह (Functional Group) असतो?

1) इथर 2) अल्डीहाइड 3) अल्कोहोल 4) नायट्रो

---

80. महर्षी कणाद व ग्रीक तत्त्ववेत्ता डेमोक्रिटस यांच्यानंतर आधुनिक युगातील कोणत्या व्यक्तीने प्रथम असे सांगितले की, प्रत्येक पदार्थ हा मूलभूत कणांपासून म्हणजेच अणूपासून बनलेले असतात?

1) जे.जे. थॉम्सन 2) जॉन डाल्टन 3) रूदरफोर्ड 4) निल भोट

---

81. पुढीलपैकी कोणती संयुगे हे आयोनिक बंधाने बांधले (ionic bond) गेले आहेत?

1) $CH_4$, $Fe_2o_3$, $KNO_3$ 2) $O_3$, $KNO_3$, Nacl

3) Nacl, $MgCl_2$, $BeCl_3$ 4) Nacl, $PCl_3$

---

82. अयोग्य जोडी ओळखा.

| पदार्थ | | रासायनिक सूत्र |
|---|---|---|
| 1) यूरिया | – | $NH_2CONH_2$ |
| 2) व्हिनेगार | – | $CH_3COOH$ |
| 3) फॉर्मेलिन | – | HCHO (diluk) |
| 4) वॉटर गॅस | – | $CO_2+H_2$ |

---



DeccanIAS

83. पुढे दिलेल्या सूत्रांपैकी भिंगासाठीचे सूत्र कोणते ते ओळखा. (Lense Formula)

1) $\frac{1}{v} - \frac{1}{u} = \frac{1}{f}$ 2) $\frac{1}{v} - \frac{1}{u} = \frac{1}{f}$

3) $u - v = f$ 4) $\frac{1}{f} = \frac{1}{u} + \frac{1}{v}$

---

84. एका समांतर जोडणीमध्ये (Parallel Arrangement) 10 Ω चे दोन रोध जोडले तर त्या दोघांचा परिणामी रोध किती असेल ?

1) 20 2) 5 3) 200 4) 2/5

---

85. ऑस्टिओमॅलासिया नामक हाडांच्या कमजोरीचा आजार यामागे पुढीलपैकी कोणत्या जीवनावश्यक घटकांची कमतरता प्रामुख्याने कारणीभूत ठरते ?

1) थायमीन 2) टेकोफेरॉल 3) कॅल्सीफेरॉल 4) ॲस्कॉर्बॉक ॲसीड

---

86. कार्बन अणूच्या वजनाच्या ...... इतक्या भागास एक अणूवस्तूमान एकक (Atomic mass Unit a.m.u) असे म्हणतात.

1) 1/6 2) 1/12 3) 1/2 4) 1/8

---

87. व्यंकटराव व रंगाराव यांच्या वयाचे गुणोत्तर अनुक्रमे 9:7 आहे. व्यंकटराव हे रंगाराव यांचे मोठे बंधूआहेत. प्रसाद व त्यांची आई, सुलोचनाबाई यांच्या वयाचे गुणोत्तर अनुक्रमे 8:15 आहे. प्रसादची बहीण रेणूका ही तिच्या आईपेक्षा 26 वर्षांनी लहान आहे व तिचे वय 19 वर्ष आहे. प्रसादचे वडील रंगाराव हे प्रसादपेक्षा 25 वर्षांनी मोठे आहेत. तर रेणूकाच्या काकांचे वय दाखवणारा पर्याय निवडा.

1) 49 2) 45 3) 63 4) यापैकी नाही

---

88. डाळिंबाच्या बागेत 625 रोपे समान उभ्या व आडव्या रांगेत लावली आहेत तर पाचव्या रांगेत एकूण किती डाळिंबाची रोपे असतील ?

1) 625 2) 15 3) 25 4) यापैकी नाही



DeccanIAS

89. एका पाण्याच्या बाटलीची धारकता ही 4/5 आहे. जर 96/5 लिटर पाणी या प्रकारच्या बाटल्यांमध्ये भरले व त्यातील 1/3 पाण्याच्या बाटल्या 'C' टेबलवर ठेवल्या. शिल्लक राहिलेल्या बाटल्यांमधील 1/4 बाटल्या 'E' टेबलावर ठेवल्या, त्यानंतर शिल्लक राहिलेल्या बाटल्यांमधून 1/3 बाटल्या 'B' टेबल वर मांडल्या व राहिलेल्या सर्व बाटल्या 'A' टेबलवर मांडल्या, तर 'A' टेबलावर असलेल्या बाटल्यांची संख्या किती?

1) 4 2) 12 3) 16 4) 8

---

90. भीमा नदीवरील उजनी धरणाच्या फुगवट्याच्या पाण्यामध्ये एक विजवाहक तारांचा खांब आहे. त्या खांबाचा 1/8 भाग चिखलात रूतलेला तर 1/3 भाग पाण्यात बुडालेला आहे. जर 39 फूट भाग पाण्याबाहेर आहे तर त्या खांबाची एकूण उंची किती फुटांची असेल?

1) 78 2) 72 3) 96 4) 48

---

91. A, B, C, D, E, F आणि G हे सात मित्र एका वर्तुळाकार टेबलाभोवती व टेबलाच्या केंद्राकडे तोंड करून बसले आहेत. खालील विधाने लक्षात घेऊन प्रश्नाचे उत्तर निवडा.

अ) G हा D च्या डाव्या बाजूला दूसरा आणि E व F चा शेजारी आहे.

ब) D हा C किंवा E चा शेजारी नाही.

क) A हा B व C चा शेजारी आहे.

खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

1) F हा G च्या लगेच उजव्या बाजूला आहे.

2) D हा A च्या डाव्या बाजूला दूसरा आहे.

3) C हा E च्या लगेचच डाव्या बाजूला शेजारी आहे.

4) वरीलपैकी एकही नाही.

---

92. एक व्यक्ती घरून ऑफिसला जाताना 12 कि.मी. प्रतितास वेगाने गेली तर 5 मिनिटे उशिराने पोहोचते. परंतु जर त्या व्यक्तीने 2 कि.मी. प्रति तासाने वेग कमी केल्यास तो 15 मिनिटे उशिराने पोहोचतो, तर घरापासून ऑफिस किती अंतरावर आहे?

1) 15 किमी 2) 10 किमी 3) 12 किमी 4) 8 किमी



DeccanIAS

93. चंदू, नंदू व संजू एका पार्टीमध्ये त्यांच्या आवडत्या पेयाविषयी बोलत होते. त्यांच्यापैकी एकजण नेहमी खोटे बोलतो. एकजण नेहमी खरे बोलतो, तर एकजण एकदा खरे एकदा खोटे बोलतो. त्या तिघांनाही चहा, कॉफी व ज्यूसपैकी वेगवेगळे पेये आवडतात. परंतू एकाला एकच पेय आवडते. वेटरने त्यांना आवडत्या पेयाविषयी विचारले असता त्यांची उत्तरे खालीलप्रमाणे होती?

नंदू : संजूला कॉफी आवडते. चंदूला ज्यूस आवडतो.

संजू : मला चहा आवडतो. चंदूला ज्यूस आवडत नाही.

चंदू : मला चहा आवडतो. नंदूला कॉफी आवडते.

वरील माहितीवरून कोणाला कॉफी आवडत आहे?

1) नंदू 2) चंदू 3) संजू 4) सांगता येत नाही.


---

94. एका आयताची लांबी 20% कमी केली व रूंदी 20% वाढवली तर त्या नवीन आयताचे क्षेत्रफळ जून्या आयतापेक्षा......

1) 4% जास्त असेल
2) 12% कमी असेल
3) 4% कमी असेल
4) दोन्ही क्षेत्रफळ सारखीच असतील

---

95. खालील आकृती a व आकृती b या एकाच घनाच्या आहेत. या आकृत्यांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून '2' अंक असलेल्या पृष्ठभागाच्या विरुद्ध बाजूच्या पृष्ठभागावर कोणता अंक असेल?




1) 1
2) 3
3) 5
4) माहिती अपूर्ण

---

96. अक्षय हा 100 मीटर अंतराची शर्यत 27 सेकंदात पूर्ण करतो, तीच शर्यत पूर्ण करायला रमेशला 36 सेकंद लागतात. तर अक्षय हा रमेशला शर्यत पूर्ण करताना किती अंतराने हरवेल?

1) 20 मी. 2) 25 मी. 3) 30 मी. 4) यापैकी नाही

---

97. टिव्हीवर चालणारे 'वजन कमी' करण्यासंबंधीचे कार्यक्रम पाहणाऱ्या लोकांचे वजन हे बऱ्याच प्रमाणात असा कार्यक्रम न पाहणाऱ्या लोकांच्या तुलनेत कमी आहे. याचाच अर्थ असे वजन कमी करण्यासंबंधीचे कार्यक्रम लोकांना शारिरिकदृष्ट्या तंदुरुस्त बनवतात.

वरील युक्तीवादातील त्रुटी सर्वात चांगल्या प्रकारे व्यक्त करणारा एक पर्याय निवडा.

1) तंदुरुस्त व्यक्ती मुळातच शरिरस्वास्थ्याबाबत जागरूक असतात.
2) जे जास्त वजनाचे असतात तेच लोक टिव्हीवर असे कार्यक्रम पाहतात.
3) वजन कमी करण्यासंबंधीचे कार्यक्रम हे सर्वच लोकांपर्यंत पोहचत नाही.
4) फक्त असे वजन कमी करण्यासंबंधीचे कार्यक्रम पाहण्याने वजन कमी होते असे नव्हे.

98. वाक्यातील रिकाम्या जागेत चपखल बसून दिलेल्या संदर्भात दोन स्वतंत्र व समान अर्थाची पूर्ण वाक्ये तयार करतील अशी शबदजोडी वा शब्दसमूह जोडी निवडा.

लोकशाहीचे यशापयश त्या राज्यातील लोकांना किती स्वातंत्र्य आहे यावर अवलंबून असते. ही लोकशाही राज्याची खरी निशाणी असते. म्हणून प्रत्येक लोकशाही राज्यात व्यक्तीला स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल असे वातावरण निर्माण करणे आणि राज्याची ........ कायम राहील या दोन्ही गोष्टीत संतुलन साधणे महत्त्वाचे आहे

1) स्थिरता, निरंकुशता
2) सुरक्षितता, असामान्यता
3) स्थिरता, सुरक्षितता
4) सुरक्षितता, अनिश्चितता

---

99. शिक्षणसंस्था, खासगी दवाखाने आणि इतर लोकांसाठी काम करणाऱ्या संस्थाचा लोकसेवेचा हेतू असतो व तो बऱ्याचअंशी साध्यही करतात. परंतु या संस्थांमध्ये काम करणारी प्रत्येक व्यक्ती ही स्वत:च्या स्वार्थासाठीच काम करत असते.

सामान्यपणे खालीलपैकी कोणते विधान वरील युक्तीलवादाला आधार देते?

1) बऱ्याचवेळा लोकांनी दर्शवलेल्या परोपकारी कृतींमागे वास्तविक त्यांचा स्वार्थी हेतू असतो.
2) बऱ्याच संस्थांचा सामाजिक हिताचा दृष्टीकोन नसतानादेखील तो साध्य होतो.
3) एखाद्या संस्थेची अंगिकारलेली मूल्ये तिच्या सर्वच सदस्यांमध्ये असतील असे नाही.
4) एखाद्या ध्येयासाठी बनलेले साधन हे दुसरे एखादे ध्येयही तितक्याच प्रभावीपणे साध्य करू शकते.

---

100. आरती ही माहीपेक्षा उंच आहे. गणू हा माहीपेक्षा उंच परंतु आरतीपेक्षा ठेंगणा आहे. काजल ही राजपेक्षा ठेंगणी आहे. माही ही राज व काजलपेक्षा उंच आहे तर माहीपेक्षा कितीजण उंच आहे?

1) 1 2) 3 3) 2 4) 4

****



DeccanIAS

# DeccanIAS™

## PSI/STI/ASO (Combined)

## पूर्व परीक्षा टेस्ट सिरीज - 2020

## वेळापत्रक

| क्र. | दिनांक | वेळ | चर्चासत्र |
|---|---|---|---|
| 1. | 3 जानेवारी 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 2. | 24 जानेवारी 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 3. | 7 फेब्रुवारी 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 4. | 24 फेब्रुवारी 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 5. | 6 मार्च 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 6. | 13 मार्च 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 7. | 27 मार्च 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 8. | 7 एप्रिल 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 9. | 17 एप्रिल 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |
| 10. | 22 एप्रिल 2020 | 9 ते 10 | 10 ते 12 |

टेस्ट्सचे स्थळ : उद्यानप्रसाद हॉल 1712/1, सदाशिव पेठ, भारत स्काउट ग्राउंडसमोर, खजिना विहीर चौक, पुणे – 30.

आमच्या डिस्कशनचा दर्जा बघण्यासाठी आमच्या **DeccanIAS** या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या.

सूचना – ( पृष्ठ 1 वरून पुढे......)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम – 82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

## नमुना प्रश्न

प्र.क्र 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) राजा राममोहन रॉय'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तरक्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र.201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये पहावा.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

DeccanIAS